१२५८०८२

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुपि/ २०/ २००३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 26 JUN 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. प्रशासन अधिकारी, शिक्षण प्रमुख
मनपा/नपा., प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे-५.

विषय : सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी घेण्याबाबत, माध्यम - इंग्रजी

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएलसर- १००२/ ११८०/२००२ ( )/प्राशि-३, दिनांक १०.६.२००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी घेण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १. | रेवाबेन नागीनदास मेहता फाऊंडेशन १२ रेवा लोकेश ए बिबवेवाडी, पुणे-४११०३७. | ब्ल्यु हेवन्स स्कूल, कात्रज, पुणे. | इंग्रजी |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा.
आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधीत सं.यांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु२०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबधित शाळा उघडणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/-च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्याचवर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनी करणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या साक्षांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
प्रति, सचिव/अध्यक्ष, संबंधित संस्था
Joshi/...

रेवाबेन नागीनदास मेहता फाऊंडेशन १२ रेवा लोकेश ए बिबवेवाडी, पुणे-३७

कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. 3030 /खाप्राशा/०५ - ०६
दिनांक — २८/१०/०५

अध्यक्ष / सचिव,
रेवाबेन नगिनदास मेहता फौंडेशन
१२ शेवा लोकेश ए विववेवाडी पुणे

विषय : सन २००२- ०३ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १) शालेय शिक्षण विभागाकडील क्र. व्ही एस एल /१००२/(११८०/०२)प्राशि -३ दि.१०.०६.०३
२) मा. शिक्षण उपसंचालकाकडील जाक्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता /पुवि /५३२८/३२/२०/०४/दि. २७.०२.०४ चे पत्र.

मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. २९ दि. ८.४.२००५ नुसार ब्ल्यू हेवन प्रायमरी स्कूल, कात्रज, पुणे या शाळेस सन २००२- ०३ या शैक्षणिक वर्षात इ. १ ली च्या वर्गास फक्त एका तुकडीस इंग्रजी माध्यमासाठी ~~विनाअनुदानित~~/कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर शाळा सुरू करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे १ यांचेकडील दि. २७.२.२००४ चे पत्रातील अटींचे पालन संस्थने करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत : -
मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.

KED.DOC/SHRI/213

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा. क्र/खाप्राशा/ ८८४ २००३-०४
दिनांक २२/५/२००४

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
रेवाबेन नागिनदास मेहता,
ब्लू हेवन इंग्लीश मिडियम स्कूल
कात्रज पुणे ४६.

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एस. १००२ (१०००/०२) प्राशि - ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया - वर्गांना सन २००३-०४ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे या २० रू. स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे माध्यम | वर्ग/ तुकडया मान्यता |
|---|---|---|
| १ | इंग्रजी/मराठी माध्यम | इ. २रीच्या एका वर्गास नैसर्गिक वाढीने. |

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

मा. शिक्षण उपसंचालक,

Original papers

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे- ४११००५.
जा.क्र. ५०२६ खाप्राशा/ ०५ – ०६
दिनांक — 27/2/06

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
ब्ल्यू हेवन स्कूल
२७/२, कात्रज कोंढवा रोड, कात्रज, पुणे-४६.

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.व्ही.एल.एस.१००२(१०००/०२) प्राशि – ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया – वर्गांना सन २००४ – ०५ 05-06, 06-07 या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे रू.२० किंवा रू.१०० .स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | ३ री | नैसर्गिक वर्ग | जून २००४ |
| | | ४ थी | नैसर्गिक वर्ग | जून २००५ |
| | | ५ वी | नैसर्गिक वर्ग | जून २००६ |

६ वी, ७ वी चे वर्ग मूळ ठिकाणी सुरु ठेवावेत.

अटी व शर्ती :

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून दयावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहीजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणीत व सेवा शर्तींच्या नवीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असवयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

original paper

शिक्षणमंडळ कार्यालय, पुणे मनपा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना, शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा / ५६९९ / ०६-०७
दि. ३०।३।०६

व्यवस्थापक / शाळाप्रमुख,
रेवाबेन नागिनदास मेहता फौंडेशनची
व्ह्यू हेवन स्कूल,
२६१७ कात्रज कोंढवा रोड कात्रज पुणे-४६.

विषय- कायम विनाअनुदानित तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | इ. ६ वी | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |
| | | इ. ७ वी | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

शिक्षणमंडळ कार्यालय,पुणे मनपा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना,शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा / ५६९९ /०
दि. ३०।३।०६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
रेव्ह. बेन नागेन्द्र डॉ. मेहता फौंडेशनची
न्यू हेवन स्कूल
४५७/१ कात्रज कोंढवा रोड कात्रज पुणे-४६.

विषय- कायम विनाअनुदानित त्तत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
| --- | --- | --- | --- | --- |
| १ | इंग्रजी | इ. ६वी | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |
| | | इ. ७वी | नैसर्गिक प्रथमवर्ग | जून २००६ |

**अटी व शर्ती:-**

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना
व विनियमन) अधिनियम २०१२अंतर्गत
स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा
स्थापन करण्यासाठी २०१९-२० या
शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: एसएफएस-१०१९/ प्र.क्र.६१३/एसएम- २
मदाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: २७ जून,२०१९

<u>प्रस्तावना:-</u> रेवबेन नगिनदास मेहता फौउंडेशन,बिबवेवाडी,पुणे ३७ संचलित, ब्ल्यु हेवन्स सेकंडरीस्कूल,महादेव नगर, शेलारमळा, कात्रज. पुणे ४६ या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ शाळा स्थापन करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय-</u>

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत रेवबेन नगिनदास मेहता फौउंडेशन, बिबवेवाडी, पुणे ३७ संचलित, ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कूल, महादेव नगर,शेलारमळा,कात्रज, पुणे ३७ या इंग्रजी माध्यमाच्या उच्च प्राथमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शाळेस (इयत्ता ६ वी ते १२वी, इंग्रजी माध्यम सर्व शाखा, राज्यमंडळ), सन २०१९ -२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पुर्तता करण्याच्याअधीन राहून शासन परवानगी देण्यात येतआहे.

२.२ <u>अटी व शर्ती-</u>

१) सदर संस्थेने अतिरिक्त रुपये १५०००/- इतक्या रक्कमचे चलन, अद्ययावत बँक बॅलेन्स प्रमाणपत्र, सन २०१६-१७ च २०१७-१८ चे लेखपरिक्षण अहवालाच्या प्रती तसेच इयत्ता १ ली ते ५ वी चे आरेटीई नमुना - २ प्रमाणपत्रची अद्ययावत प्रत संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआपक रद्य समजन्यात येईल.

२) बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची / तरतूदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदीची पुर्तता करुन सन २०१९ -२० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबीची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिका-याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१९-२० करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबीची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून

अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना, "*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२७.०८.२०१३

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे ,
६. शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे.

Scanned by CamScanner

# पुणे जिल्हा परिषद, पुणे.
## यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in


## प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/ 414/ 3942 /2024 पुणे 1 दिनांक: /04/2024 24/07/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
रेवबेन नगिनदास मेहता फौंडेशन, बिबवेवाडी पुणे 37 संचालित
ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कूल, ( 27251600636 ) महादेव नगर, शेलार मळा, कात्रज, पुणे 46

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शा.नि.क्रमांक एसएफएस-1019/प्र.क्र.613/ एसएम-2, दिनांक27/06/2019 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई व क्र. प्राशास्थ 323/प्र.क्र.415/23/एसएम-1, दिनांक 25/04/2023

2.जा.क्र.शिउस/प्राथ 202/ स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/2018-19, शिक्षण उपसंचालक पुणे विभाग दि 20/09/2019

3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव 06/07/2023 व त्रुटी पुर्तता दिनांक 18/01/2024

4.श्री.शब्बीर लालू शेख, विस्तार अधिकारी (शिक्षण),जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल दिनांक 22/04/2024

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रेवबेन नगिनदास मेहता फौंडेशन, बिबवेवाडी पुणे 37 | ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कूल, ( 27251600636 ) महादेव नगर, शेलार मळा, कात्रज, पुणे 46 | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 8 वी | 2019-20 |

### अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1019/प्र.क्र.613/ एसएम-2, दिनांक 27/06/2019 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

परवानगी वर्ष :-२०१-२०
माध्यम : इंग्रजी
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्य-३०३/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१९ 16696
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 24 OCT 2019

**प्रति,**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान नविन शाळे साठी जून-२०१९ पासून इ. ९ वी व इ. १० वी इंग्रजी माध्यम चे वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.**
**रेवाबेन नागिनदास मेहता फाउडेशन संचलित ब्लु हेवन्स सेकंडरी स्कुल महादेवनगर, शेलारमळा, कात्रज पुणे**

**संदर्भ :-** १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्रमांक नाहप्र-२००९/(६६३/०९) माशि-१, दिनांक २०.६.२०१२
२) शालेय शिक्षण विभाग,मुंबई कडील शासान निर्णय क्रमांक एसएफएस-१०१८/प्र.क्र. १५६९/एस.एम.-२ दिनांक ६.३.२०१९
३) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/३७ दिनांक २०.०९.२०१९
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प/ शिक्षण /माध्य/४६७३/ २०१९ दिनांक ०१.१०.२०१९

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्व**रेवाबेन नागिनदास मेहता फाउडेशन संचलित ब्लु हेवन्स सेकंडरी स्कुल महादेवनगर,** या इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळेस संदर्भीय क्र. २ चे शासन निर्णयानुसार स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राज्यमंडळ उच्च प्राथमिकला जोडून माध्यमिक, इ. ९ वी ते १० वी इंग्रजी माध्यम दर्जावाढ करिता देण्यात आलेली होती. तदनंतर या कार्यालयाने संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये माध्यमिक दर्जावाढ शाळा उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक इ. ९ वी ते १० वी इंग्रजी माध्यम राज्यमंडळ करिता सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळेस परवानगी दिलेली आहे.

आता आपल्या संदर्भीय क्रमांक ४ व्दारे आपण दिलेली स्वयंस्पष्ट शिफारस विचारात **घेता उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक इ. ९ वी व इ. १० वी चे वर्गास सन २०१९-२०२० पासून इंग्रजी माध्यम राज्यमंडळ दर्जावाढ शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वाकरिता प्रथम मान्यता** देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
५.संच निश्‍चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१-२०** पासून असेल
१३.शैक्षणिक वर्ष **२०१-२० मध्ये** ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी माध्यम नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

प्रथम मान्यता २०२४-२५
माध्यम : इंग्रजी
स्वयंअर्थ सहाय्यित शाळा

जा.क.शिउसं/उमाशि-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२५/ई-ऑफिस
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

प्रति
प्राचार्य, ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कलु, महादेव नगर, शेलारमळा, कात्रज, पुणे

**विषय -** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रथम मान्यता देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्र.६१३/एसएम-२ दि.२७.०६.२०१९
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउस/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/६७४९ दि. २०.०९.२०१९
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे यांचे जा.क्र.१२२०८ दि.१९.१२.२०२४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस २०१९-२० वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत संदर्भ क्रमांक २ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. त्या प्रस्तावानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णया नुसार खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन पत्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | रेवबेन नगिनदास मेहता फौंडेशन, बिबवेवाडी, पुणे ३७ | ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कलु, महादेव नगर, शेलारमळा, कात्रज, पुणे | इंग्रजी | राज्यमंडळ | उच्च माध्यमिक इ.११वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित | २०२४-२५ |

**अटी व शर्ती-**

१. ज्या व्यवस्थापनास सन २०१५-१६ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.
२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी
३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी
४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी
५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत
६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही
७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल
८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून असेल.
९ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र मराठी/इंग्रजी उच्च माध्यमिक नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,पुणे

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७
फॅक्सनं.- ०२०- २६१२२२१७

प्रथम मान्यता २०२४-२५
माध्यम : इंग्रजी
स्वंयअर्थ सहाय्यित शाळा

जा.क.शिउसं/उमाशि-४०५/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०२५/ई-ऑफिस
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

प्रति

प्राचार्य, ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कलु, महादेव नगर, शेलारमळा, कात्रज, पुणे

**विषय -** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी प्रथम मान्यता देण्याबाबत....

**संदर्भ** :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१९/प्र.क्र.६१३/एसएम-२ दि.२७.०६.२०१९
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. शिउस/प्राथ-२०२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१८-१९/६७४९ दि. २०.०९.२०१९
४. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे यांचे जा.क्र.१२२०८ दि.१९.१२.२०२४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस २०१९-२० वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत संदर्भ क्रमांक २ अन्वये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता परवानगी देण्यात आलेली आहे. त्या प्रस्तावानुसार आपल्या उच्च माध्यमिक शाळेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णया नुसार खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन पत्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता/ शाखा | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पुणे | रेवबेन नगिनदास मेहता फॉडेशन, बिबवेवाडी, पुणे ३७ | ब्ल्यु हेवन्स सेकंडरी स्कलु, महादेव नगर, शेलारमळा, कात्रज, पुणे | इंग्रजी | राज्यमंडळ | उच्च माध्यमिक इ.११वी सर्व शाखा स्वयंअर्थसहाय्यित | २०२४-२५ |

**अटी व शर्ती-**

१. ज्या व्यवस्थापनास सन २०१५-१६ करिता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रददबातल ठरेल.
२. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी
३. संच निश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी
४. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी
५. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत
६. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही
७. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल
८ शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून असेल.
९ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१० शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र मराठी/इंग्रजी उच्च माध्यमिक नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील